# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा)
## जनसंपर्क विभाग


===================================================== ======================================

जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/ १२५६ दि. १०/०९/२०२०

**<u>प्रसिद्धी पत्रक</u>**

## श्री. अनिल डिग्गीकर यांनी स्विकारला म्हाडा उपाध्यक्षपदाचा कार्यभार

मुंबई, दि. १० सप्टेंबर, २०२० :- श्री. अनिल डिग्गीकर यांनी आज महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी या पदाचा कार्यभार स्विकारला.

श्री. डिग्गीकर १९९० च्या बॅचचे भारतीय प्रशासन सेवेतील (आय.ए. एस.) अधिकारी आहेत. म्हाडा उपाध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी श्री. डिग्गीकर पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिवपदी कार्यरत होते.

श्री. डिग्गीकर यांनी सन १९९० मध्ये रत्नागिरी येथे सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी अनेक कार्यकारी पदे भूषविली. सन १९९२-१९९४ मध्ये लातूर येथे सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मोलाची कामगिरी केली. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त, पुणे येथील महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाचे (महाऊर्जा) महासंचालक, बृहन्मुंबई महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, मुख्यमंत्री कार्यालयात प्रधान सचिव व विशेष कार्य अधिकारी म्हणूनही त्यांनी काम केले आहे. विविध लोकाभिमुख वैशिष्ट्यपूर्ण कामामुळे कृतिशील प्रशासकीय अधिकारी अशी त्यांची ओळख आहे.

श्री. डिग्गीकर स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील (Civil Engineering) पदवीधर असून बंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (IIM) येथून सार्वजनिक धोरण व व्यवस्थापनासाठी परिणामात्मक पद्धती व परिचालन संशोधन या विषयात व्यावसायिक शिक्षण घेतले आहे. नवी दिल्ली येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन ट्रेड मधून वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन, पाचगणी येथील सेंटर फॉर गव्हर्नन्स येथून सार्वजनिक प्रशासनातील नीतिशास्त्र, इंदोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (IIM) मधून नेतृत्व विकास कार्यक्रम अशा विषयांवर प्रगत अभ्यासक्रम पूर्ण करून शिक्षण घेतले आहे. श्री. डिग्गीकर यांना वाचन, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्राची आवड आहे.

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

========================



**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे उपाध्यक्ष श्री. अनिल डिग्गीकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अरुण डोंगरे.**